ePaper

## सोलापुरात पावसाचा कहर; 1 हजार 248 हेक्टर बागायती पिकांचे नुकसान



| वर्ष - 8 । अंक - 292 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | बुधवार, दि. 28 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- ब्रूकने घेतला अविश्वसनीय कॅच!
- धावांचा पाऊस पाडला, वजन कमी केलं
- मला वेश्या असल्यासारखं वाटलं
- काळजी करू नका....राहुल गांधी

## शिवसेनेचे खासदार नरेश म्हस्के, भाजपाचे आशिष शेलार, नारायण राणे तुटून पडले..

# मुंबई तुंबण्याला फक्त 'मातोश्री' कारणीभूत!

## सर्व घोटाळ्यांचा स्रोत शेवटी 'मातोश्री' वर होत असल्याचा आरोप!

## मुंबई महापालिकेवर 7/12 उद्धव ठाकरेंचाच!

। मुंबई। प्रतिनिधी । महाईन्यूज

**मुंबईत पडणाऱ्या कोसळधार पावसामुळे शहर आणि उपनगराची तुंबापुरी झाली असून त्याचे खापर एकमेकांच्या डोक्यावर फोडण्याची स्पर्धा सुरू झाली आहे. उबाठा गटाचे आदित्य ठाकरे यांनी भाजपा आणि एकनाथ शिंदे यांच्यावर टीका सुरू केल्यानंतर सत्ताधारी आता थेट ठाकरे आणि 'मातोश्री' वर सटकले आहेत. मुंबईची ही दुरवस्था होण्यात सर्वात मोठा हातभार उद्धव ठाकरे यांचा कंपू आणि 'मातोश्री' त वावरणारे सर्व टग्यांचा आहे, असा आरोप करण्यात आला आहे.**



### ठाकरेंवर चोहोबाजूंनी टीकास्त्रे...

आदित्य ठाकरे आणि उबाठा गटाचे अनिल परब यांनी मुंबईच्या अवस्थेची चिरफाड करताना केलेल्या आरोपानंतर शिवसेनेचे खा. नरेश म्हस्के, मुंबईचे पालकमंत्री आशिष शेलार आणि भाजपाचे खासदार नारायण राणे तसेच त्यांचे चिरंजीव मंत्री निलेश राणे यांनी चोहोबाजूंनी टीकास्त्रे सोडून ठाकरे घराण्याला कोंडीत पकडले आहे.

### मुंबई महानगरपालिका ठाकरेंचीच !

या सर्वांचा रोख उद्धव ठाकरे आणि 'मातोश्री' कडे असून गेली २५ वर्षे मुंबई महानगरपालिकेवर अबाधित सत्ता ही ठाकरे घराण्याची होती. त्यांनी जणू महापालिकेवर सातबारा ठोकला होता, असे आरोप करण्यात येत आहेत. त्यामुळे मुंबईची तुंबई करण्यात फक्त 'मातोश्री' कारणीभूत असल्याचा सर्वांचा आरोप आहे.

### सगळा भ्रष्टाचार ठाकरेंच्या काळात

शिवसेनेचे खा. नरेश म्हस्के यांनी पत्रकार परिषदेत 'मातोश्री' वर हल्लाबोल केला आहे. कोविड काळात खिचडीमध्ये घोटाळा, बॉडीबॅग खरेदीमध्ये घोटाळा करणारे खरे भ्रष्टाचारी असून त्यांना शिवसेना नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करण्याचा अधिकार नाही, असे सांगत त्यांनी आदित्य ठाकरे यांचे आरोप खोडून टाकले. ठाण्यातील आनंद आश्रम येथे त्यांची पत्रकार परिषदे झाली.

### कुठे 350 रुपये, कुठे सात हजार?

म्हस्के म्हणाले, की आपण महापौर असताना ठाणे महापालिकेने कोरोना काळात ३५० रुपयांनी बॉडीबॅगची खरेदी केली. मात्र, त्याच कंपनीची बॉडीबॅग मुंबई महापालिकेने सात हजार रुपयांना खरेदी केली. खिचडी घोटाळ्यात सूरज चव्हाण जेलमध्ये गेला. तो कोणाचा मित्र आहे ? पत्राचाळ घोटाळ्यात संजय राऊत जेलमध्ये गेले. त्यामुळे भ्रष्टाचार करणाऱ्यांना शिंदे यांच्यावर बोलण्याचा आणि टीका करण्याचा काहीही नैतिक अधिकार नाही, अशी खरमरीत टीका म्हस्के यांनी केली आहे. भ्रष्टाचाराचे सर्व स्रोत 'मातोश्री' पर्यंत जातात, असे ते म्हणाले.

### एकनाथ शिंदे यांना डावलले..

महाराष्ट्रात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकार असताना मुंबईच्या नियोजन बैठकीत तत्कालीन नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांना डावलले गेले होते. यासंदर्भात आपण उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत यांच्याकडे तक्रार केली असता मुंबई महानगरपालिका हा विषय ठाकरे फॅमिलीचा आहे, सर्व निर्णय ठाकरे फॅमिली आणि मित्र परिवार घेणार, एकनाथ शिंदेंना सांग की मुंबई महापालिकेत लक्ष घालू नका, हा माझा निरोप दे, असेही संजय राऊत यांनी सांगितल्याचा दावा खा. म्हस्के यांनी यावेळी केला.

### आनंद दिघे यांचा कायम द्वेष

खासदार म्हस्के म्हणाले की, संजय राऊत यांनी धर्मवीर आनंद दिघे यांचा कायम द्वेष केला. राऊत यांच्या मुलाखतीमुळेच आनंद दिघे यांना टाडा लागला. वंदनीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेबांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुसळधार पावसातही मुंबई आणि ठाण्यात केलेल्या कामाचे कौतुक केले, असे खासदार म्हस्के म्हणाले.

### वंदनीय बाळासाहेबांचे उद्गार ऐका..

म्हस्के म्हणाले की आपल्या स्वप्नात वंदनीय बाळासाहेब ठाकरे आले होते. एकनाथ शिंदे भरपावसात धावपळ करत आहेत. मात्र, माझ्याच जिवावर मोठे झालेले, खासदारकी मिळवणारे, इतकी वर्ष मुंबई महापालिकेची सत्ता उपभोगणारे घरकोंबड्यासारखे घरात बसलेत. समाजकारणाचे मी दिलेल्या तत्वाचे पालन करत नाहीत, हे माझे शिष्य होते, याची मला लाज वाटते, याउलट एकनाथ शिंदे यांचा गर्व वाटतो, असे उद्गार बाळासाहेबांनी काढले होते. पाकिस्तानची भाषा संजय राऊत बोलतोय, पाकिस्तानची बाजू घेतोय, मी जर असतो तर 'ऑपरेशन सिंदूर' च्या यशाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मी स्वत: मुंबईत बोलावून सत्कार केला असता. आपली माणसे पाकड्यांची भाषा बोलतात, त्यांना हिंदुस्थानच्या जनतेने जोड्याने हाणले पाहिजे, अशी वक्तव्ये बाळासाहेबांनी स्वप्नात येऊन केली, असे खासदार म्हस्के म्हणाले.

### मिठीचा गाळ काढताना आदित्य ठाकरे कोठे होते?

भाजपाचे मंत्री आणि मुंबईचे पालकमंत्री आशिष शेलार यांनी आदित्य ठाकरे यांच्यावर हल्लाबोल केला आहे. मिठी नदीतील गाळ, मुंबई तुंबणे, मुंबईतील रस्ते आणि विकास कामे याबद्दल बोलण्याचा आदित्य ठाकरे यांना काहीही अधिकार नाही. आपले सरकार ज्यावेळी मिठी नदीतील गाळ काढत होते, त्यावेळी आदित्य ठाकरे कुटुंबियांसह इंग्लंडमध्ये थेम्स नदीत मजा मारत होते. भारताने दहशतवादाच्या विरोधात मोठे पाऊल उचलले, त्यावेळी चकार शब्द न काढता संपूर्ण ठाकरे घराणे परदेशात चैन करत होते, असा आरोपही शेलार यांनी केला आहे.

# आळंदीत इंद्रायणी नदीला पूर!

## भक्त पुंडलिक मंदिरात पाणी; भक्ती सोपान पुलावर पाणी; के. टी. बंधाऱ्यास जलपर्णींचा विळखा

।आळंदी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**इंद्रायणी नदीचे पाणलोट क्षेत्रासह लाभक्षेत्रात होत असलेल्या संततधारेच्या पावसाने अलंकापुरीत नदीला पूर आला आहे. इंद्रायणी नदीने काठ सोडला आहे. पुराचे पाणी दुतर्फा पसरले असून नदी काठचा राम मंदिराकडील रस्ता रहदारीला बंद झाला आहे. पुराचे पाणी भक्त पुंडलिक मंदिरात शिरले आहे. राम घाट, भक्त पुंडलिक मंदिर, स्वामी महाराज मठ मागील चौंडी घाट परिसरात पाणी घुसले आहे. यामुळे नदी घाटावर काही ठिकाणी रहदारी बंद झाली आहे.**

पुराचे पाणी पाहण्यास नदी घाटावर तसेच पुलांचे वर दुतर्फा भाविकांसह नागरिकांनी गर्दी करुन पुराचे पाणी पाहत सेल्फी चा आनंद लुटत आहेत. दक्षता म्हणून पुलांवर जास्त वेळ उभे राहू दिले जात नाही. इंद्रायणी नदी घाटाचा परिसर, नवीन स्काय वॉकचे खाली पायऱ्या उतरता येत नाही. भक्त पुंडलिक मंदिरात पाणी शिरले असून श्रींचे दर्शन बंद झाले आहे. या मुळे नवीन स्काय वॉक वरून भक्त पुंडलिक मंदिरा जवळ पुला वरून खाली उताराने ये जा बंद झाली आहे. इंद्रायणी नदी वरील घाटा लगतचे महात्मा गांधी यांचे रक्षा विसर्जन स्थळ परिसरात पाणी आले आहे. भक्ती सोपान पुलाला पाणी लागले असून येथील दोन के. टी बंधारा पर्यंत पाणी आलेले आहे. पावसाचे प्रमाण वाढल्यास येथे साचून राहिलेली अडकलेली जलपर्णी पाण्यात वाहून जाण्यास मदत होणार आहे. येथे जलपर्णी अडकून साचलेली आहे. काही जलपर्णी जुन्या दगडी पुलाला अडकलेली असून ऊरचे पाण्यात वरून वाहून आलेली जलपर्णी पुढे पुराचे पाण्यात वाहून जाताना दिसत आहे.

नदी घाटावरील दुतर्फा रस्ते रहदारीला धोकादायक असल्याने नागरिकांनी, भाविकांनी दक्षता बाळगण्याचे आवाहन मुख्याधिकारी मांडव खांडेकर यांनी केले आहे. अग्निशमन विभाग, आपत्ति व्यवस्थापन कक्ष कार्यरत करण्यात आला असल्याची माहिती मुख्याधिकारी खांडेकर यांनी दिली आहे. आळंदी पंचक्रोशीत दमदार पावसाने हजेरी लावली आहे. यामुळे आळंदीतील रस्त्यांवर पाणी वाहत आहे. सांडपाणी वाहू नलिका क्षमते पेक्षा जास्त पाणी येत असल्याने अनेक ठिकाणी चेंबर मधून पाणी उफाळलेले आहे. चेंबर तुंबल्याने तसेच पाणी जाण्यास मार्ग मिळत नसल्याने हजेरी मारुती मंदिरालगत प्रदक्षिणा मार्गावर पाणी साचत आहे. वडगाव रस्त्यावरून पावसाचे पाण्यात परिसरातील कचरा हि वाहत येत आहे. आळंदी नगरपरिषदेच्या आरोग्य विभागासह आपत्ती व्यवस्थापन कक्षातुन नदी घाटावर नजर ठेवण्यात येत आहे. इंद्रायणी नदी घाटावरील भक्ती सोपान पूल, भक्त पुंडलिक मंदिर मध्येपानी शिरले आहे. नदीच्या दुतर्फा रस्ते धोकादायक असल्याने रहदारीस पर्यायी रस्ते वापरण्याचे आवाहन मुख्याधिकारी खांडेकर यांनी तसेच आळंदी मंडलाधिकारी राजेंद्र वाघ यांनी केले आहे. सर्वत्र जोरदार पाऊस होत असल्याने बळीराजात समाधान आहे. मात्र शेतीचे कामे करायची असल्याने पाऊस कमी होण्याची वाट हि पहिली जात आहे. अनेक शेतकरी यांचे शेत मशागतीची कामे उरकण्यास अवधी आवश्यक आहे. होत असलेल्या पावसाने उजनी धरण मध्येपानी पातळी वाढत आहे.



### मनकर्णिका नाल्याची दुरावस्था कायम

परिसर कचरामुक्त ठेवण्यास प्रशासनाने प्राधान्य देत पुराचे पाण्यात वाहून आलेला कचरा व जलपर्णी काढण्याचे कामास गती देण्याची आवश्यकता आहे. पाण्याने नदी पात्र दुथडी भरून वाहत आहे. नदी परिसर भाविकांचे लक्ष वेधून घेत असल्याने नदीवर दुतर्फा गर्दी दिसत आहे. पावसाने धुळीचे साम्राज्य कमी झाले आहे. मात्र शहरातील मनकर्णिका नाल्याची दुरावस्था कायम असल्याने नाल्यात राडा, रोडा, गवत वाढले आहे. भागीरथी नाल्यावरून पाणी वाहत असून गवत चीखलमय रस्ता झाला आहे. यामुळे नागरिकांतून नाराजी व्यक्त होत आहे. भागीरथी नाला मार्ग म्हणून विकसित होत असून पितळी गणपती मंदिर ते शनी मंदिर आणि हजेरी मारुती मंदिर ते भोई धर्मशाळा या दरम्यान रस्त्याची दुरावस्था कायम आहे.

# शिरूरमध्ये भटक्या श्वानांचा नागरिकांना त्रास

## मोकाट श्वानांचा बंदोबस्त करण्याची नागरिकांकडून मागणी

। शिरूर । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**शिरूर शहरातील गुजर कॉलनी परिसरात मोकाट श्वानांनी नागरिक हैराण झाले असून, दोन श्वानांनी सहा वर्षांच्या मुलीवर हल्ला केल्याची घटना गेल्या रविवारी घडली. मोकाट श्वानांनी आतापर्यंत १७ पेक्षा अधिक लहान मुलांना चावा घेतला आहे. त्यामुळे मोकाट श्वानांचा बंदोबस्त करण्याची मागणी या परिसरातील नागरिकांनी नगरपरिषदेकडे केली आहे.**



शिरूर शहर आणि उपनगरात भटक्या श्वानांची संख्या वाढली आहे. या श्वानांमुळे अपघाताच्या घटनाही घडल्या आहेत. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी नगरपरिषदेला निवेदन देण्यात आले. यावेळी शिरूर नगर परिषदेचे माजी सभापती विठ्ठलराव पवार, सविता वाबळे, संध्या दारोळे, सविता बोरुडे, छाया यादव,धनश्री मच्छिंद्र कदम, नंदा संतोष नवले, राजश्री रोकडे, सिंधू सोमनाथ पळसकर, पूजा भास्कर हरिहर, प्रीती प्रकाश बनसोडे, पूजा भोंडवे, सुप्रिया गावडे, रश्मी जगदाळे, नितीन यादव, आशिष पळसकर, दत्तात्रय शेलार, महेश कुरंदळे, महेश पठारे, सुहास वाबळे आदी उपस्थित होते.

याबाबत पालिकेचे स्वच्छता अधिकारी दत्तात्रय बर्गे म्हणाले, 'शिरूर शहरातील मोकाट श्वानांचे गेल्या दोन वर्षांपासून निर्बिजीकरण करण्यात येत आहे. गुजर कॉलनी परिसरातील श्वानांना पकडण्याचा प्रयत्न पालिकेच्या पथकाने वारंवार केला आहे. मात्र, त्यांना अद्याप पकडता आलेले नाही. याबाबत मुख्याधिकारी प्रीतम पाटील यांना अहवाल सादर करून कार्यवाही करण्यात येणार आहे.'

### समस्या

भटक्या कुत्र्यांची संख्या वाढली आहे, ज्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.
शाळकरी मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिक यांना विशेषतः त्रास सहन करावा लागत आहे.
रात्रीच्या वेळी कुत्र्यांचे टोळके रस्त्यावर फिरत असल्यामुळे नागरिकांना घराबाहेर पडणे कठीण झाले आहे.

### उपाययोजना

नगरपालिकेने भटक्या कुत्र्यांच्या समस्येकडे लक्ष द्यावे, आणि त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी तात्काळ उपाययोजना कराव्यात.
नागरिकांनी सतर्क राहावे, विशेषतः लहान मुलांना एकटे बाहेर न सोडणे.
भटक्या कुत्र्यांच्या हालचालींबाबत माहिती संबंधित अधिकाऱ्यांना कळवावी.

## आषाढी वारी पालखी सोहळ्यातील सेवा सुविधांचा आढावा

# पालिकेकडून स्वागताची तयारी अंतिम टप्प्यात!

## आषाढी वारी पालखी सोहळ्यातील सेवा सुविधांचा आढावा



### पालखी मार्गाची पोलीस व महापालिका प्रशासनाकडून पाहणी

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आषाढी वारी पालखी सोहळ्याच्या स्वागताची तयारी अंतिम टप्प्यात आली असून पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे आणि महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी पालखी मार्गाची मंगळवारी (२७ मे) पाहणी केली.**

पिंपरी चिंचवड शहरात जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे १९ जून रोजी आगमन होणार असून यादिवशी पालखीचा मुक्काम आकुर्डी येथे असणार आहे. तर संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे पिंपरी चिंचवड हद्दीमध्ये २० जून रोजी आगमन होणार असून त्याच दिवशी पालखी पुण्याच्या दिशेने मार्गस्थ होणार आहे. या दोन्ही सोहळ्याच्या स्वागत आणि नियोजनासाठी पोलीस आणि महापालिका प्रशासन सुक्ष्म नियोजन करीत आहे. या अनुषंगाने आज पोलीस व महापालिका प्रशासनाच्या वतीने पालखी मार्गाची संयुक्त पाहणी करण्यात आली.

या पाहणी दौऱ्यावेळी महापालिका शहर अभियंता मकरंद निकम, सह शहर अभियंता बापू गायकवाड, देवन्ना गट्टूवार, उपायुक्त अण्णा बोदडे, राजेश आगळे, सचिन पवार, सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, कार्यकारी अधिकारी शिवराज वाडकर, संतोष दुर्गे, अपर पोलीस आयुक्त सारंग आव्हाड, पोलीस उप आयुक्त डॉ. शिवाजी पवार, बापू बांगर यांच्यासह पोलीस आणि महापालिका प्रशासनाचे अधिकारी उपस्थित होते.

### पालखी मार्गावरील खड्डे बुजवा - आयुक्त

आषाढीवारी पालखी सोहळ्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांमध्ये कोणत्याही प्रकारची कमतरता राहणार नाही, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने सोयीसुविधांचे नियोजन करावे. पालखी मार्गावर पावसाचे पाणी कोठेही तुंबणार नाही, याची दक्षता घेऊन या मार्गावरील खड्डे बुजविण्याच्या सुरु असलेल्या कार्यवाहीचा वेग वाढवावा. वारकऱ्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणी योग्य त्या सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश यावेळी आयुक्त सिंह यांनी दिले. पालखी सोहळा मार्गावर वारकऱ्यांसाठी देण्यात येणाऱ्या सुविधांचा आढावा यावेळी घेण्यात आला.

# लोणावळ्यात सशस्त्र दरोड्याचा थरार!

## कुकरी, तलवारी, घातक शास्त्रांचा धाक दाखवत साडे अकरा लाखांचे दागिने व रोकड लंपास

। लोणावळा । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोणावळ्यातील प्रसिद्ध डॉक्टर हिरालाल खंडेलवाल यांच्या बंगल्यात पुन्हा एकदा पडलेल्या सशस्त्र दरोड्याने खळबळ उडाली आहे. मंगळवारी मध्यरात्री २० ते २२ सशस्त्र दरोडेखोरांनी कुकरी, तलवारी यांसारख्या घातक हत्यारांची बंगल्यात प्रवेश करत डॉ. खंडेलवालसह चौघांना मारहाण करत जवळपास ११ लाख ५० हजारांचा ऐवज लंपास केला.**




डॉ. खंडेलवाल यांच्या बंगल्यावर चार वर्षांत चौथ्यांदा दरोडा पडला असुन, यापैकी दोनदा दरोडेखोरांना दरोडा टाकण्यात मोठे यश आले आहे. रात्री पोलिस आणि दरोडेखोरांमध्ये चोर पोलिसांचा खेळ सुरू असल्याचे येथील सीसीटीव्हीत स्पष्ट झाले आहे. पोलिसांच्या समोरच व त्यांच्या गाडीसमोरच दरोडेखोरांनी पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पसार झाल्याने पोलिसांच्या तत्परता आणि कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याप्रकरणी तरूण चंद्रमोहन खंडेलवाल (वय-५८, रा . वर्धमान इन्क्लेव्ह, लोणावळा) यांनी लोणावळा सर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. लोणावळा शहर पोलिसांनी माहितीनुसार, मंगळवारी मध्यरात्री पावणेतीन वाजण्याच्या सुमारास डॉ. हिरालाल खंडेलवाल यांच्या खोंडगेवाडी प्रधानपार्क येथील ओम श्री बंगल्यात अनोळखी २० ते २२ सशस्त्र दरोडेखोरांनी तलवार, कुकरी आदी हत्यारांनिशी बंगल्याचे लोखंडी गेट, मुख्य दरवाजाचे लोखंडी ग्रील आणि बेडरूमच्या दरवाजाचे कडीकोयंडा तोडून बंगल्यामध्ये प्रवेश केला. बंगल्याचे पोर्चमध्ये झोपलेले वॉचमन अंबादास रामदास रायबोने यास कुकरीचा धाक दाखवून त्यास दांडक्याने मारून त्याचे व त्याची पत्नी वर्षा रायबोने यांचे कपड्याने हातपाय बांधले. त्यानंतर डॉ. खंडेलवाल यांच्या बेडरूमचा दरवाजा तोडत त्यांनाही मारहाण करून त्यांचे हातपाय बांधले व त्यांना जीवे मारण्याची धमकी देत बंगल्यातील सोन्या चांदीचे व डायमंडचे दागिने व २५ हजार रुपयांची रोकड मिळून सुमारे ११ लाख ५० हजारांचा ऐवज लंपास केला. यामध्ये दरोडेखोरांनी १.२५ लाखांचे सोन्याचे कडे, दोन अंगठ्या, सोन्याची चेन, तुलसी माळ, मंगळसूत्र, देवाचे दागिने, ५ लाखांचा डायमंड सेट आणि २५ हजारांची रोख रक्कम असा एकूण साडे 11 लाख रुपयांचा ऐवज चोरून नेला.

### दरोडेखोर सिसिटीव्हीत कैद...

घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकारी, गुन्हे शाखेचे पथक घटनास्थळी दाखल होत तपास सुरू केला. दरोडा पडत असताना डॉक्टर खंडेलवाल यांचे पुतणे यांनी लोणावळा शहर पोलिसांना दरोड्या बाबतची माहिती दिली. माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोलीस वाहनांमधून आले होते. त्याचवेळी त्यांच्यासमोरच सर्व दरोडेखोर जात असल्याचे सीसीटीव्हीतील दृश्यांमध्ये स्पष्ट दिसत आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### निरभिमानी परोपकार ही भगवंताची सेवाच

प्रत्येक मनुष्याला परोपकाराची बुद्धी असणे अत्यंत जरूर आहे. पण तो कुणाला शक्य आहे आणि कुणी करावा, याचा विचार करायला पाहिजे. ज्या शेतात पाणी भरपूर पुरून उरत असेल त्याच शेतातले पाणी बाहेर टाकता येते, आणि ते हितावहही होते. इतर शेतांच्या बाबतीत हे होत नाही; अशा शेताला पुरेसे पाणी कसे मिळेल याचाच आधी विचार करणे जरूर आहे. हीच दृष्टी परोपकार करणाऱ्या व्यक्तीने ठेवावी. ज्या महात्म्यांनी स्वतःचा उद्धार करून घेऊन, जगाच्या कल्याणाकरिताच जन्म घेतला, त्यांनाच परोपकाराचा अधिकार.

मग प्रश्न असा येतो की, इतरांनी परोपकाराची बुद्धी ठेवू नये आणि तसा प्रयत्नही करू नये की काय ? तर तसे नाही. परोपकाराची बुद्धी आणि प्रयत्न असणेच जरूर आहे. परंतु परोपकार म्हणजे काय, आणि त्याचा दुष्परिणाम न होऊ देता तो कसा करता येईल, हे पाहणे आवश्यक आहे. भगवंताची सेवा या भावनेने दुसऱ्याकरिता केलेली मेहनत याला परोपकार म्हणता येईल, आणि त्यापासून नुकसान होण्याची भीती नाही. परंतु हे वाटते तितके सोपे नाही; कारण मनुष्याची सहज प्रवृत्ती अशी की, थोडेसे काही आपल्या हातून झाले की, 'ते मी केले, मी असा चांगला आहे', अशा तऱ्हेचा विचार येऊन तो अभिमानाला बळी पडतो. सबब, ज्या ज्या वेळी दुसऱ्याकरिता काही करण्याची संधी मिळेल, त्या त्या वेळी तिचा फायदा घेऊन मनाला अशी शिकवण द्यावी की, 'देवा, तुझ्या सेवेचा लाभ मला दिलास ही माझ्यावर कृपा झाली. अशीच कृपा ठेवून आणखी सेवा करून घे.' ही विचारसरणी जागृत राहिली नाही, तर आपला कसा घात होईल याचा पत्ताच लागणार नाही. म्हणून अत्यंत जपून वागणे जरूर आहे. परोपकार याचा सरळ अर्थ पर-उपकार; म्हणजे दुसऱ्यावर केलेला उपकार. यावरून असे लक्षात येईल की, परोपकाराला दोन व्यक्तींची गरज लागते. एक उपकार करणारा, आणि दुसरा उपकार करून घेणारा. जगातल्या सर्वसाधारण व्यक्ती पाहिल्या, तर आपल्या स्वतःवरून असे दिसते की, मी एक निराळा, आणि प्रत्येक व्यक्ती आणि वस्तुमात्रागणिक सर्व जग निराळे. मनाच्या या ठेवणीमुळेच, जर आपल्या हातून दुसऱ्याचे कधीकाळी एखादे काम होण्याचा योग आला, तर 'मी दुसऱ्याचे काम केले' ही जाणीव होऊन अहंकार झपाट्याने वाढू लागतो. म्हणून परोपकाराच्या बाबतीत अत्यंत सावध राहण्याची सूचना सर्व संतांनी दिली आहे. नामात राहिले म्हणजे अहंकार नाहीसा होऊन सावधानता येते आणि चित्त शांत होते.

**बोधवचनः- जगात परोपकारी म्हणून नावाजलेले, पण भगवंताचे अधिष्ठान नसलेले मोठेमोठे लोकसुद्धा मानाभिमानात कोठेतरी अडकल्यावाचून राहणार नाहीत.**



## 'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**प्रेम सर्वसाधारणपणे सर्व प्राणीमात्रांवर, मुक्या जनावरांवर करावे, त्यांच्याशी सहानुभूतीने वागावे असे संतांनी, धर्म वचनात सांगितले आहे आणि कोणत्याही संवेदनशील माणसाला पटेल असा हा उपदेश आहे. त्यातही भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा शेतीवर आधारित आहे. आजही यांत्रिक, तांत्रिक प्रगती झाली असली तरी बैल या प्राण्याकडून शेतीची बरीच कामे करून घेतली जातात. भारतीय सण, उत्सव, बऱ्याचशा परंपरा या निसर्ग, पर्यावरणाशी संलग्न आहेत. आणि पर्यावरणात नाग, बैल आदी जीव शेतीला सहाय्य करणारे आहेत. मदत करणारे आहेत. त्यांच्याबाबत कृतज्ञता व्यक्त करण्या साठी नागपंचमी, वसुबारस, पोळा किंवा बेंदूर असे सण महाराष्ट्रात साजरे केले जातात.**

# भारताचे 'ऑपरेशन सिंदूर', की झूल घातलेल्या विरोधकांचा बेंदूर?



### बैलाची कातडी ओढलेला मनुष्यप्राणी

साहजिकच, या प्राणिमात्रांबद्दल मनात अनन्य भावना, आदर व्यक्त करणे गरजेचे आहे. मात्र, बैलाची कातडी अंगावर ओढून घेतलेल्या आणि सण उत्सव आहे म्हणून बेंदूरच्या उत्सवात सामील झालेल्या मंडळींना त्यांची खरी ओळख करून दिलीच पाहिजे. दहशतवादाविरोधात हाती घेतलेली 'ऑपरेशन सिंदूर'ची कारवाई या बैलाची कातडी ओढलेल्या मनुष्य प्राण्यांसाठी जो बेंदूर सण झाला आहे, तो स्पष्टपणे उघड केला पाहिजे.

### पाकचे नामोनिशान मिटवा..

पहलगाम येथे झालेला भ्याड दहशतवादी हल्ला आठवा.. त्याला अचूक, चोख उत्तर दिले पाहिजे, अशीच देशवासीयांची भावना होती. चोख उत्तर याचा अर्थ पाकड्यांवर आक्रमण करून पाकचे नामोनिशाण मिटवून टकणे, असा त्याचा अर्थ होता. अर्थात, आजच्या काळात अशा प्रकारे एखाद्या देशाचे नामोनिशाण मिटवून टाकणे सोपे नाही. याची जाणीव सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांना आहे. लालबहादुर शास्त्री व इंदिरा गांधी यांच्या काळातही ते घडले नाही, हे लक्षात घ्या !

### ते सहा दहशतवादी कोठे आहेत?

मात्र, सध्या सत्तारूढ पक्षाची मंडळी आपल्याला जनतेचा पाठिंबा मिळावा, यासाठी चुन चुन के मारुंगा म्हणतात, तर विरोधी पक्षातली मंडळी ते सहा दहशतवादी कुठे आहेत ? आणि ते भारतात शिरले कसे ? असा प्रश्न उपस्थित करून युद्ध पूर्ण होण्यापूर्वीच विजयी रॅली काढता कसे? असे प्रश्न उपस्थित करतात. खरे तर सत्तारूढ आणि विरोधक या दोघांच्याही म्हणण्याला, प्रश्नांना वास्तवात फारसा अर्थ नाही.. त्यांच्या बोलण्यात गांभीर्य नाही..

### फक्त टार्गेट दहशतवादी अड्डे !

भारतीय जनता पार्टीने लोकप्रिय केलेला शब्द मराठी नॅरेटीव्ह किंवा फेक नॅरेटिव्ह हा युध्दासंदर्भात विरोधकांच्या प्रचाराचा मुद्दा आहे. भारताने पाकचे दहशतवादी अड्डे आणि शंभरावर दहशतवादी ठार केले आहेत. यापुढे जी चर्चा होईल, ती फक्त द्विपक्षीय चर्चा असेल. अमेरिकेचा त्यात हस्तक्षेप नसेल. युद्धविराम झाला, त्यात अमेरिकेचा सहभाग नाही. ज्यांच्यामुळे हे युद्ध सुरू झाले, ते सहा दहशतवादी अद्याप सापडलेले नाहीत. मात्र, पाकच्या हद्दीच्या आत घुसून त्यांचे लष्करी अड्डे उद्ध्वस्त केले आणि असे करत असताना पाक नागरिकांना कोणतीही इजा केली नाही, हे लष्कराने आणि परराष्ट्र खात्याच्या सचिवांनी, परराष्ट्र मंत्र्यांनी स्पष्ट केले आहे.

### पाकड्यांचा दहशतवादी बुरखा..

भारताच्या बाजूने काही देशांनी स्पष्ट भूमिका घेतली. संयुक्त राष्ट्रांमध्ये पाकवर पुराव्यासह आरोप केले आणि जगापुढे पाकड्यांचा खरा चेहरा स्पष्ट व्हावा, यासाठी जगभरात आपल्या देशाची प्रतिनिधी मंडळे पाठवण्यात आली. हे सगळे झाल्यावर काँग्रेसचे नेते राहुल गांधी आणि त्यांचे प्रवक्ते वारंवार काही प्रश्न उपस्थित करत आहेत. ज्याचे गांभीर्य त्यांनी घालवले आहे. पाकबरोबर सुरू असलेले युद्ध का थांबवले ? किंवा भारताच्या ज्या भागावर म्हणजेच काश्मीरवर पाकिस्तानने कब्जा केला आहे, तो भाग आपण का सोडवला नाही ? भारताची किती विमाने पाकिस्तानने पाडली? यासह परराष्ट्र मंत्री आणि पंतप्रधान तसेच संरक्षण सल्लागार अजित डोवाल यांची रणनीती, कूटनीती कशी अयशस्वी ठरली आहे, याचा परिपाठ ही मंडळी दररोज वाचत आहेत, हे मोठे दुर्दैव म्हणावे लागेल !

### विशेष अधिवेशन कशासाठी?

या संदर्भात विशेष अधिवेशन बोलवण्याची मागणीही त्यांनी केली. ही मागणी म्हणून योग्य असली तरी शरद पवार यांनीच संसदेच्या अशा अधिवेशनात गोपनीय बाबी उघड करता येत नाहीत. त्यामुळे अधिवेशन घेतले न घेतले विरोधकांना जे मुद्दे आणि माहिती पाहिजे ती अधिवेशनात मिळत नाही. हे स्पष्ट केले आहे. शरद पवार हे संरक्षण मंत्री होते. वैचारिक दृष्ट्या सत्तारूढ पक्षाचे आणि त्यांचे कितीही मतभेद असले तरी धोरणात्मक निर्णयांच्या बाबतीत शरद पवार हे देशाच्या व्यवस्थेतूनच आणि यंत्रणेच्या अंमलबजावणीतूनच विरोधकांना शहाणपणाच्या चार गोष्टी सांगत आहेत, हे लक्षात घ्यायला हवे !

### भाजपाच्या पदरात यश पडू नये, यासाठी..

अर्थात् कारवाई सुरू असताना आणि ते युद्धविरामापर्यंत गेल्यावर भाजपाच्या वाट्याला जे काही पडले आहे, ते यश म्हणून त्यांच्या पदरात पडू नये, यासाठी विरोधकांचा आणि विशेषतः काँग्रेसचा आटापिटा सुरू आहे, हे स्पष्ट होत आहे. या कारवाई दरम्यान अमलात आणलेली कूटनीती किंवा नियोजन हे जगजाहीर करून अवलंबले जात नाही. ते परिणामाच्या दृष्टीने दीर्घकालीन मुत्सद्दीपणाचा भाग असतो. अर्थात् राहुल गांधी यांनी भारताच्या गोपनीय बाबी, सरकार, लष्कर किंवा परराष्ट्र मंत्र्यांनीच जाहीर केल्याचे आरोप केला आहे. हल्ला करण्यापूर्वी त्याची सूचना देणे, हा फसलेला रणनीतीचा भाग असल्याचा आरोपही राहुल गांधी यांचा आहे. त्यावरही सरकारच्या वतीने, लष्कराच्यावतीने खंडन केले गेले आहे, हे राहुल यांच्या समजण्यापलीकडचे आहे!

### विरोधकांच्या हातात चाव्या..

मात्र, गेल्या चार दिवसात विरोधकांना 'ऑपरेशन सिंदूर' पेक्षा आपला 'बेंदूर' सण साजरा करायचा आहे आणि त्यामुळे वाटेल ती झूल पांघरून आपली शिंगे रंगवून, पायात चाळ बांधून ही मंडळी आरडाओरडा करत आहेत. विदेशात पाकची पोलखोल करण्यासाठी आणि आपल्या देशाची युद्धजन्य काळातली वस्तुस्थिती स्पष्ट करण्यासाठी जी प्रतिनिधी मंडळे पाठवली गेली आहेत, त्यात काँग्रेसची मंडळी पण आहेत. महत्त्वाच्या सर्वच राजकीय पक्षांची मंडळी केवळ त्या मंडळात नव्हे, तर त्या मंडळाचे प्रमुख पद सांभाळत आहेत. त्यांना जे काही सांगण्यात आले, किंवा परदेशात जे मांडायचे आहे, त्याबाबतची सर्व माहिती सरकार, लष्कराकडून दिली गेली आहे. ही मंडळी हुशार आहेत. साहजिकच त्यांना वस्तुस्थिती नक्कीच समजली असेल.

### काँग्रेसींना समजावण्यासाठी थरूर हवेत..

खरे तर शशी थरूर यांच्यावर परदेशातल्या मंडळींना समजावून सांगण्यापेक्षा राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे , श्रीनेत आणि माध्यमातील कथित विद्वान, पत्रकार, संपादक यांनाच सर्व बाबी समजावून सांगण्याची जबाबदारी द्यायला पाहिजे. अन्यथा, 'ऑपरेशन सिंदूर' ची वस्तुस्थिती बाजूला राहील. त्याचबरोबर सत्तारूढ पक्षातील अनेक लोकप्रतिनिधींना भारत, पाक चकमकीच्या संदर्भातील युद्धाच्या अनुषंगाने वास्तवाचे ज्ञान, भान देण्यासाठी श्रीकांत शिंदे यांच्यासह रविशंकर प्रसाद आदी ज्येष्ठ मंडळींना नियुक्त केले पाहिजे. सत्तारूढ आणि विरोधकांच्या एकूणच मानसिकतेमध्ये बेंदूर साजरा करण्याची अनावर इच्छा असल्यामुळे, बेंदूर हा सण ते उत्साहाने साजरा करत आहेत. परिस्थितीचे गांभीर्य या मंडळींना यावे, एवढीच त्या बळीराजांचा साथी असलेल्या वृषभ राजाकडे प्रार्थना आहे!

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## मुसळधार पावसामुळे सोलापूर जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतीपिकांचे तातडीने पंचनामे करण्याची मागणी

# सोलापुरात पावसाचा कहर!

## 1 हजार 248 हेक्टर बागायती पिकांचे नुकसान

।सोलापूर।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**सातत्याने पडत असलेल्या वळवाच्या मुसळधार पावसामुळे सोलापूर जिल्ह्यात १२८ गावांतील १ हजार २४८ हेक्टर क्षेत्रावरील बागायती पिकांचे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतीपिकांचे तातडीने पंचनामे करण्याची मागणी होत आहे.**



जिल्ह्यात आतापर्यंत २०६ मिमी सार्वत्रिक पाऊस झाला आहे. त्यामुळे नद्यांना प्रचंड प्रमाणात पाणी वाढले असून तेथे पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. गावोगावी शेतांमध्ये पावसाचे पाणी शिरले आहे. त्यामुळे जागोजागी शेततळ्यांचे स्वरूप आले आहे. या पावसाचा फटका बागायती फळबागांना बसला आहे. जिल्ह्यातील १२८ गावे पावसाच्या तडाख्यात सापडली आहेत. यात एकूण १२४८ हेक्टर क्षेत्रावर पिकांची हानी झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना चिंता सतावत आहे. केळी, द्राक्षे, पपई, सीताफळ, आंबा, चिक्कू, डाळिंब आदी फळबागांना फटका बसला आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी गावच्या शिवारात १४ दिवसांत आतापर्यंत २१० मिलीमीटर इतका पाऊस झाला आहे. त्यामुळे संपूर्ण गाव शिवारात पाणी साचले आहे. शेतात पाण्याचे तळे निर्माण झाले असून पिकांची मोठ्या प्रमाणात हानी झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. याच गावातील मल्लिनाथ पटणे यांच्या पाच एकर क्षेत्रातील पंपईची बाग वादळीवाऱ्यासह पावसामुळे जमीनदोस्त झाली आहे. यात पटणे यांनी २० ते २५ लाख रुपयांचे नुकसान सोसावे लागत असल्याचे सांगितले. हे नुकसानीचे चित्र अक्कलकोटपासून ते करमाळा, माळशिरस तालुक्यापर्यंत दिसून आले.

### बार्शी तालुक्यातील भोगावती नदीला पूर

बार्शी तालुक्यातील भोगावती नदीला पूर आल्याने त्या भागातील गावांचा संपर्क तुटला आहे. यात बार्शी येथून तुळजापूरकडे निघालेली एसटी बस पावसातून वाट काढत बार्शीपासून काही अंतरावर रेल्वे बोगद्यातून जात असताना अचानकपणे बंद पडली. ही एसटी बस रेल्वे बोगद्यातच अडकून पडली होती. त्यातच पावसाचा जोर कायम होता. त्यामुळे आपत्कालीन व्यवस्थापन प्राधिकरणाच्या पथकाने धाव घेऊन एसटी बसमध्ये अडकलेल्या सर्व प्रवाशांना सुखरूपपणे बाहेर काढले.

## नुकसानग्रस्तांना 'एनडीआरएफ'च्या निकषांप्रमाणे मदत

## पावसामुळे सुमारे 35 हजार हेक्टरवरील शेती पिकांचे नुकसान

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राज्यात गत चार-पाच दिवसांपासून मुसळधार पूर्वमोसमी पाऊस पडत आहे. पावसामुळे सुमारे ३५ हजार हेक्टरवरील शेती पिकांचे नुकसान झाले आहे. शेतजमिनी खरवडल्या आहेत. घरे, जनावरांचे गोठ्यांचेही नुकसान झाले आहे. या सर्व नुकसानग्रस्तांना राष्ट्रीय आपत्ती निधीच्या निकषांप्रमाणे (एनडीआरएफ) आर्थिक मदत दिली जाणार आहे.**



राज्यात शनिवार ते सोमवार या काळात झालेल्या अतिमुसळधार पावसामुळे सुमारे ३५ हजार हेक्टरवरील पिके, भाजीपाला, फळबागांचे नुकसान झाले आहे. त्यासह वीज पडून, पाण्यात बुडून, घराची भिंत कोसळून, झाड पडून आठ जणांचा मृत्यू झाला आहे, तर दोन जण जखमी झाले आहेत. राज्यभरात आठ जनावरांचांही मृत्यू झाला आहे.

राज्यभरातील सर्व नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. या सर्व नुकसानग्रस्तांना राष्ट्रीय आपत्ती निधीतून मदत दिली जाणार आहे, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

दोन दिवसांत १९ कोटी भ्रमणध्वनी लघु संदेश मंत्रालयात राज्य स्तरावर कार्यरत असलेल्या मदत कक्षातून २६ आणि २७ मे, या दोन दिवसांत पाऊस आणि विजा पडण्याच्या घटनेत एकूण ५२ पूर्वसूचना भ्रमणध्वनी लघु संदेशाद्वारे पाठविण्यात आल्या. दोन दिवसांत एकूण १९.२२ कोटी भ्रमणध्वनी लघु संदेश पाठविण्यात आले आहेत. या शिवाय मंत्रालयात २४ तास नियंत्रण कक्ष सुरू आहे.

### एनडीआरएफच्या 18 तुकड्या सज्ज

राज्यातील पूरस्थिती हाताळण्यासाठी राज्यभरात राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या १८ तुकड्या सज्ज आहेत. त्यापैकी मुंबईत तीन, पालघरमध्ये एक, नागपूरमध्ये दोन आणि पुण्यातील मुख्यालयात एक पथक तैनात आहे. तर मुंबईत आणखी दोन, रायगडमध्ये एक, ठाण्यात दोन, रत्नागिरी, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सिंधुदुर्गमध्ये प्रत्येकी एक पथक तैनात करण्यात आले आहे. राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची सहा पथकेही राज्यभरात तैनात करण्यात आली आहेत.

# भारतद्वेष हेच "पाकिस्तानचे ध्येय!

## गुजरात दौऱ्यात पंतप्रधान मोदी यांचा पाकिस्तानवर हल्ला

। दाहोद (गुजरात) ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**"पाकिस्तानचे एकमेव ध्येय भारताचा द्वेष करणे आणि शेजाऱ्यांना हानी पोहोचवणे आहे, तर भारताचे ध्येय गरिबी दूर करणे आणि आर्थिक विकास घडवून आणण्याचे आहे," असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी गुजरातमध्ये दाहोद येथील सभेला उद्देशून केलेल्या भाषणात केले. आमच्या बहिणींचे 'सिंदूर' पुसण्याचे धाडस करणाऱ्यांचा अंत निश्चित आहे, अशी टीका पंतप्रधानांनी पाकिस्तानवर केली.**



पंतप्रधानांनी यावेळी 'ऑपरेशन सिंदूर'चे कौतुक केले आणि ही केवळ लष्करी कारवाई नसून भारताच्या नीतिमत्ता आणि भावनांची सखोल अभिव्यक्ती असल्याचे वर्णन केले. "पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि मोदी शांत कसे बसू शकतात? जो कोणी आपल्या बहिणींच्या कपाळावरील 'सिंदूर' पुसण्याचे धाडस करेल, तो निश्चितच संपेल," असे पंतप्रधान म्हणाले. मोदींविरुद्ध लढणे किती कठीण असेल याची दहशतवाद्यांनी स्वप्नातही कल्पना केली नसेल. २६ मे २०१४ रोजी देशाच्या नागरिकांनी 'प्रधानसेवक' बनवताना दिलेल्या जबाबदारीचा हा एक भाग असल्याचे पंतप्रधानांनी सांगितले.

पंतप्रधान मोदींनी दाहोद येथे २४,००० कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन केले. देशातील पहिल्या ९,००० अश्वशक्तीच्या लोकोमोटिव्ह इंजिनचे तसेच २१,४०५ कोटी रुपये खर्चून बांधलेल्या रोलिंग स्टॉक वर्कशॉपचे अनावरण त्यांनी केले. अहमदाबाद-वेरावळ वंदे भारत सेवा आणि वलसाड-दाहोद एक्सप्रेस गाड्यांना त्यांनी हिरवा झेंडा दाखवला.

### 'भारतीय उत्पादनांना प्राधान्य द्या'

भारताचे ध्येय विकसित राष्ट्र बनणे असून जनतेने 'मेड इन इंडिया' उत्पादनांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन पंतप्रधानांनी केले. होळी, दिवाळी, गणेशोत्सव या सणांमध्ये परदेशी वस्तूंऐवजी भारतीय उत्पादने वापरावी, असे पंतप्रधान म्हणाले. भारतीय सणांमध्ये फटाके, गणेशमूर्ती यांसारख्या आयात केलेल्या वस्तूंच्या वापराबाबत पंतप्रधानांनी दु:ख व्यक्त केले आणि आयात केलेल्या वस्तू थांबवल्या पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

### 'ऑपरेशन सिंदूर'चे उपराष्ट्रपतींकडून कौतुक

भोपाळ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने पहलगाम हल्ल्याला अतिशय चोख प्रत्युत्तर दिले आहे आणि जगभरात स्पष्ट संदेश दिला आहे की दहशतवाद कोणत्याही किमतीत खपवून घेतला जाणार नाही, असे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी सोमवारी मध्य प्रदेशातील नरसिंहपूर येथे एका कार्यक्रमात सांगितले. दहशवादाविरोधात राबवलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'चे उपराष्ट्रपतींनी कौतुक केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भूमिका अशी होती की ज्यांनी आपल्या बहिणींचे कोट्यवधी सिंदूर पुसले आहेत, त्यांना या पृथ्वीवर जगण्याचा अधिकार नाही आणि पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याविरुद्ध संपूर्ण देश देशभक्तीच्या भावनेने एकजूट राहिला आहे, अशी प्रशंसा धनखड यांनी केली.

भारताने बहावलपूर, मुरीदके आणि इतर ठिकाणी झालेल्या दहशतवादी हल्ल्यांना अचूक बॉम्बस्फोटांद्वारे प्रत्युत्तर दिले आहे, ते जगाने मान्य केले आहे असेही धनखड म्हणाले.

---

# जातीनिहाय जनगणनेवरून काँग्रेस आक्रमक

## मोदी यांच्या जुन्या ध्वनिचित्रफिती प्रसारित करून टीका

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी जातीनिहाय जनगणना करण्याच्या निर्णयाची प्रशंसा केल्यानंतर काँग्रेसने सोमवारी दोन ध्वनिचित्रफिती प्रसिद्ध करून मोदी यांच्यावर टीका केली आहे. या ध्वनिचित्रफितींमध्ये पंतप्रधान मोदी हे जातीनिहाय जनगणना घेण्याच्या विरोधकांच्या मागणीवर टीका करताना दिसत आहेत.**



दिल्लीमध्ये रविवारी आयोजित करण्यात आलेल्या रालोआशासित मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या बैठकीत पंतप्रधान मोदी यांनी जातीनिहाय जनगणना करण्याच्या निर्णयाचे समर्थन केले होते. यामुळे विकासात मागे राहिलेल्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी एक पाऊल आहे, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला होता. काँग्रेसच्या माध्यम विभागाचे प्रमुख आणि पक्षाचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी पंतप्रधान मोदी यांच्या या दोन ध्वनिचित्रफिती 'एक्स'वरून सामायिक केल्या. रालोआ मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत मोदी यांनी अपेक्षेप्रमाणे जातीनिहाय जनगणनेचे सर्व श्रेय घेतले अशी टीकाही रमेश यांनी केली. रालोआ मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत आणीबाणीला ५० वर्षे पूर्ण होत असताना काँग्रेसला लक्ष्य करण्याची रणनीती निश्चित करण्यात आली.

तो धागा पकडून काँग्रेसने पंतप्रधान मोदी यांची ११ वर्षांची राजवट ही अघोषित आणीबाणी असल्याची टीका केली. मोदींचे चांगल्या दिवसांचे आश्वासन हे वास्तवात दु:स्वप्न ठरले असल्याची टीका पक्षाने केली.

### मोदींची विरोधातील वक्तव्ये

२ ऑक्टोबर २०२३च्या ध्वनिचित्रफितीत मोदी असे म्हणताना ऐकायला मिळते की, "ते (विरोधक) समाजाची जातीच्या आधारावर विभागणी करत असत आणि अजूनही ते हे पाप करत आहेत." तर २८ एप्रिल २०२४ रोजी मोदी म्हणाले होते की, "जातीनिहाय जनगणनेची काँग्रेसची मागणी हा त्यांच्या शहरी नक्षली मानसिकतेचा भाग आहे."

### या संदर्भात, काँग्रेस पक्ष काय म्हणतोय:

**सामाजिक न्यायाचा मुद्दा:** काँग्रेसचा असा युक्तिवाद आहे की जातींची अचूक माहिती उपलब्ध झाल्यास सरकारला सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गासाठी अधिक प्रभावी धोरणं तयार करता येतील.

**आरक्षणाचा पुनर्विचार:** जातीनिहाय आकडेवारीमुळे आरक्षण धोरणात बदल करणे, किंवा ते अधिक न्याय्य बनवणे शक्य होईल, असं काँग्रेसचं म्हणणं आहे.


**भाजपवर टीका:** काँग्रेसने सत्ताधारी भाजप सरकारवर आरोप केला आहे की ते जातीगत जनगणना टाळत आहे, कारण त्यांना सामाजिक विषमतेचे वास्तव जनतेसमोर यायला नको आहे.


**राजकीय गणित:** काँग्रेस अनेक राज्यांमध्ये ओबीसी, दलित आणि इतर मागासवर्गीय मतदारांना आकर्षित करण्यासाठी हा मुद्दा पुढे नेत आहे.

# ऐश्वर्या नारकरांचा मुलगा भारतात परतला!

अलीकडच्या काळात सगळेच कलाकार सोशल मीडियावर सक्रिय असतात. काही दिवसांपूर्वीच इन्स्टाग्रामच्या 'आस्क मी सेशन'मध्ये 'झी मराठी'च्या लोकप्रिय नायिकेने प्रेमाची कबुली दिली होती. या अभिनेत्रीचं नाव आहे ईशा संजय. 'झी मराठी'च्या 'लाखात एक आमचा दादा' या मालिकेमुळे ईशा घराघरांत लोकप्रिय झाली आहे. यामध्ये ती सूर्या दादाच्या बहिणीची म्हणजेच राजश्री (राजू) ही भूमिका साकारत आहे.

ईशाला एका नेटकऱ्याने "तुझं लग्न झालंय का दीदी?" असा प्रश्न विचारला होता. यावर अभिनेत्रीने अमेय नारकरबरोबरचा फोटो शेअर करत नेटकऱ्याला, "लग्न नाही झालंय कारण, कोणीतरी खूप दूर आहे सध्या" असं उत्तर दिलं होतं. यामुळे दोघंही लाँग डिस्टंस रिलेशनशिपमध्ये आहेत हे स्पष्ट झालं होतं. यासह आता अभिनेत्रीने नुकताच शेअर केलेला व्हिडीओ देखील चर्चेत आला आहे. अमेय हा ऐश्वर्या व अविनाश नारकरांचा मुलगा आहे. सध्या अमेय परदेशात उच्चशिक्षण घेत आहे. त्यालाही इंडस्ट्रीत करिअर करायचं आहे. असं ऐश्वर्या यांनी एका मुलाखतीत सांगितलं होतं. नुकताच तो भारतात परतला आहे. यावेळी एअरपोर्टवर त्याचं स्वागत करण्यासाठी पुष्पगुच्छ घेऊन ईशा पोहोचली होती. अमेयला अनेक महिन्यांनी पाहिल्यावर तिने पटकन धावत जाऊन त्याला मिठी मारल्याचं या व्हिडीओमध्ये पाहायला मिळत आहे.





## 'जिस्म'मध्ये काम न करण्याचा अनेकांनी दिलेला सल्ला

'राज', 'जिस्म', 'नो एंट्री', 'ओमकारा', 'बचना ऐ हसीनों', 'रेस' व 'आक्रोश' यांसारख्या अनेक चित्रपटांमधून प्रेक्षकांच्या भेटीला आलेली अभिनेत्री म्हणजे बिपाशा बासू. २७ वर्षांपूर्वी मॉडेलिंगच्या क्षेत्रात नाव कमवल्यानंतर तिने मनोरंजन क्षेत्रात येण्याचा निर्णय घेतला. मग अभिनेता अक्षय कुमारबरोबर बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं. 'अजनबी' हा तिचा पहिला चित्रपट होता. बिपाशा बासूची यशस्वी कारकीर्द सुरू असतानाच तिला एक असा चित्रपट ऑफर झाला, जो न करण्यासाठी तिला अनेकांनी सल्ला दिला होता. हा चित्रपट म्हणजे 'जिस्म'. तिच्या कारकीर्दीतला हा एक महत्त्वाचा चित्रपट होता. पण तिला अनेकांनी या चित्रपटात काम न करण्यासाठी सल्ला दिला होता. याबद्दल तिने 'टाइम्स नाऊ'शी तिची प्रतिक्रिया व्यक्त केली. २००३ मध्ये 'जिस्म' हा चित्रपट प्रदर्शित झाला. जॉन अब्राहमने या चित्रपटाद्वारे बॉलीवूडमध्ये पदार्पण केले. त्यावेळी, बिपाशा हे इंडस्ट्रीमध्ये आधीच प्रसिद्ध व लोकप्रिय असलेलं नाव होतं. त्यामुळे या चित्रपटामुळे तिच्या यशस्वी कारकिर्दीला धक्का लागू शकते, यामुळे अनेकांनी तिला या चित्रपटात काम न करण्याचा सल्ला दिला होता. मात्र तरीदेखील बिपाशाने यात काम केलं.



## अन् मुख्य नायिकेला अश्रू अनावर!

'झी मराठी'च्या 'तुला शिकवीन चांगलाच धडा' आणि 'नवरी मिळे हिटलरला' या दोन मालिकांनी नुकताच प्रेक्षकांचा निरोप घेतला. या दोन्ही मालिकांची निर्मिती शर्मिष्ठा राऊतने केली होती. 'नवरी मिळे हिटलरला' ही मालिका गेल्यावर्षी मार्च महिन्यात प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. २५ मे रोजी या मालिकेचा अखेरचा भाग प्रदर्शित झाला. मालिकेच्या शेवटच्या दिवशी सेटवर सगळेच कलाकार भावुक झाल्याचं पाहायला मिळालं. 'नवरी मिळे हिटलरला' या मालिकेत सरस्वती जहागीरदार ही भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री भूमिका पाटीलने युट्यूबवर व्हिडीओ शेअर करत सेटवरच्या शेवटच्या दिवसाची झलक सर्वांना दाखवली. यावेळी पॅकअप झाल्यावर सगळेजण भावुक झाल्याचं पाहायला मिळालं. या मालिकेची मुख्य नायिका लीला म्हणजे वल्लरी विराजला अश्रू अनावर झाले होते.



'नवरी मिळे हिटलरला' मालिकेच्या सेटवर शेवटच्या दिवशी लीलाचा डोहाळेजेवणाचा कार्यक्रम पार पडला होता. या कार्यक्रमात जहागीरदारांच्या सुना व इतर मंडळी उत्साहात सहभागी झाली होती. हे शूट पार पडल्यावर सगळ्या गोष्टी आवरून सेटवर शेवटचं पॅकअप करण्यात आलं. याची झलक प्रेक्षकांना भूमिजाच्या व्हिडीओमध्ये पाहायला मिळते. यावेळी मुख्य नायिका लीला मालिकेच्या सगळ्या फॅन पेजेसनी शेअर केलेल्या इन्स्टा स्टोरीज पाहत असते...यादरम्यान तिचं मन भरून येतं. "सगळ्या फॅन पेजेसनी आपल्या मालिकेला निरोप देताना 'अभी ना जाओ छोडकर, के दिल अभी भरा नहीं' हे गाणं इन्स्टा स्टोरीजला लावलंय...मी खूप इमोशनल होतेय" असं लीला या व्हिडीओमध्ये सरस्वती आणि लक्ष्मी यांना सांगत असते. यानंतर अचानक तिचे डोळे पाणावतात आणि वल्लरी सेटवर भावुक झाल्याचं पाहायला मिळालं. यावेळी सरस्वती आणि लक्ष्मीने तिला धीर देत "रडू नकोस, आपलं ठरलंय ना नाही रडायचं" असं सांगितलं.

## पल्लवी जोशीचे सडेतोड उत्तर

विवेक अग्निहोत्री यांनी दिग्दर्शित केलेला 'द काश्मीर फाइल्स' हा चित्रपट ११ मार्च २०२२ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. तीन वर्षांनंतरही या चित्रपटाची सर्वत्र चर्चा होत आहे. चित्रपटच्या प्रदर्शनानंतर काही प्रेक्षकांनी या चित्रपटाचं भरभरून कौतुक केलं, तर काहींच्या मते हा एक विशिष्ट प्रोपगंडा (प्रचारकी) करणारा चित्रपट होता. प्रेक्षकांबरोबरच काही कलाकारांनीदेखील या चित्रपटाबद्दल समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न, मुस्लिम समाजाबद्दल द्वेष निर्माण करणारा चित्रपट असल्याची टीका केली होती. अशातच या टीकाकारांना विवेक अग्निहोत्री यांच्या पत्नी व अभिनेत्री पल्लवी जोशी यांनी थेट उत्तर दिलं आहे. पल्लवी जोशींनी नुकताच 'आरपार'शी संवाद साधला. या संवादात त्यांनी 'काश्मीर फाइल्स'ला प्रचारकी चित्रपट बोलणाऱ्यांबद्दल प्रतिक्रिया व्यक्त केली. यावेळी त्या असं म्हणाल्या, "आमच्या चित्रपटाला प्रोपगंडा (प्रचारकी) चित्रपट म्हणणारे खूप असेही लोक होते, जे राजकीयदृष्ट्या प्रेरित होते. त्या लोकांचं ऐकून सामान्य प्रेक्षकसुद्धा बोलायला लागले. पण जे लोक असं बोलत होते, त्यांना आता वस्तुस्थिती कळली ना?" यापुढे त्या म्हणाल्या, "आम्ही फक्त काश्मिरी पंडितांबद्दल त्या चित्रपटात बोललो होतो. आम्ही त्यांच्या त्रासाबद्दल बोललो होतो. त्यांच्याशी आम्हाला काय घेणं-देणं असे म्हणणारे लोक होते. हा चित्रपट आणण्याचा उद्देश्य हा होता, की ही काश्मीरची गोष्ट नाही तर ही आपल्या भारताची गोष्ट आहे. काश्मीरला तुम्ही वेगळं नका समजू." यानंतर पल्लवी जोशींनी सांगितलं, "काश्मीर खूप लांब आहे आणि तिकडे जाण्यासाठी दोन विमानांचा प्रवास करावा लागतो; म्हणून याचा अर्थ असा नाही की, त्यांची काहीतरी वेगळी ओळख आहे किंवा त्यांचं वेगळं अस्तित्व आहे.न



## अजय देवगणबरोबर बॉलीवूड चित्रपटात काम करण्याची इच्छा

'कराटे किड लेजेंड्स' हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. विशेष बाब म्हणजे अजय देवगणचा मुलगा युग आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रदर्शित होणाऱ्या चित्रपटातील पात्राला त्याचा आवाज देणार आहे. या चित्रपटात अजय देवगणने जॅकी चॅन यांच्या पात्राला आवाज दिला आहे.

आता अभिनेता अजय देवगण व जॅकी चॅनचा एक व्हिडीओ निर्मात्यांनी प्रदर्शित केला आहे. 'सोनी पिक्चर्स इंडिया'ने इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये जॅकी चॅन व अजय देवगण यांच्यात संवाद सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. अजय देवगण जॅकी चानला म्हणतो की मी तुमचा खूप मोठा चाहता आहे. त्यानंतर मला भारतात येण्यासाठी आमंत्रित कर, असे म्हणत जॅकी चॅन यांनी अजयबरोबर बॉलीवूडमध्ये काम करण्याची इच्छा व्यक्त केली.

व्हिडीओमध्ये पुढे पाहायला मिळते की अजय देवगण जॅकी चॅनला म्हणतो की तुमच्याबरोबर काम करायला आवडेल. जॅकी अजय देवगणला असेही म्हणाताना दिसत आहेत की तू ॲक्शन सीन कर मी डान्स करतो. तसेच जॅकी चॅन 'कुंग फू योगा' चित्रपटातील डान्स स्टेप्स करून दाखवताना दिसत आहे. या चित्रपटात दिशा पटानी, सोनू सूद हे कलाकारदेखील दिसले होते. सोशल मीडियावर व्हिडिओ शेअर झाल्यानंतर अनेक चाहत्यांनी दोन्ही कलाकारांचे कौतुक केले. एका चाहत्याने लिहिले, "दोघांना एकत्र पाहण्याची वाट पाहत आहे", दुसऱ्या एका चाहत्याने लिहिले, "दोन दिग्गजांना एकत्र पाहणे आनंदाचे असणार आहे", आणखी एका नेटकऱ्याने लिहिले, "वाह", एका नेटकऱ्याने लिहिले, "या दोन दिग्गज कलाकारांना एकत्र पाहण्यास उत्सुक आहे."

# बंगळूरुला विजय अनिवार्य!

## आज लखनऊ सुपर जायंट्सचे आव्हान

।लखनऊ।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु इंडियन प्रीमियर लीगच्या (आयपीएल) अखेरच्या लढतीत मंगळवारी लखनऊ सुपर जायंट्सचा सामना करेल, तेव्हा त्यांचा प्रयत्न गुणतालिकेत शीर्ष दोन स्थानांमध्ये आपली जागा निश्चित करण्याचा असेल. तर दुसरीकडे लखनऊचा संघ हंगामाचा शेवट विजयाने करण्यासाठी प्रयत्नशील असेल.**



गुजरात टायटन्सच्या सलग पराभवांमुळे तिसऱ्या स्थानी असणाऱ्या बंगळूरुला शीर्ष दोन संघांमध्ये स्थान मिळवण्याची चांगली संधी आहे. 'आयपीएल'च्या गुणतालिकेत शीर्ष दोन स्थानी असणाऱ्या संघांना तिसऱ्या व चौथ्या स्थानावरील संघांपेक्षा अंतिम फेरी गाठण्याची अतिरिक्त संधी मिळते. बंगळूरुचे १७ गुण आहेत. त्यांना अग्रस्थान गाठायचे असल्यास हा सामना जिंकणे अनिवार्य आहे. मुंबई इंडियन्स व पंजाब किंग्ज या सामन्यातून कोणताही एक संघ गुजरात टायटन्सच्या (१८ गुण) पुढे जाण्यास सज्ज आहे. भारत-पाकिस्तान यांच्यातील संघर्षामुळे लीगला स्थगित करण्यात आले होते. त्यापूर्वी बंगळूरुचा संघ चांगल्या लयीत होता. त्यांनी सलग चार सामने जिंकले होते. मात्र, लीग स्थगित झाल्यानंतर बंगळूरुची लय प्रभावित झाली.

लीग पुन्हा सुरू झाल्यानंतर कोलकाता नाइट रायडर्सविरुद्ध त्यांचा सामना पावसामुळे झाला नाही. नंतर सनरायजर्स हैदराबादकडून त्यांना ४२ धावांनी पराभूत व्हावे लागले. ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज जोश हेझलवूडचे संघात पुनरागमन झाल्याने बंगळूरुचा आत्मविश्वास दुणावला असेल. हेझलवूडने संघासाठी १० सामन्यांत १८ गडी बाद केले आहे. स्पर्धेत सर्वाधिक बळी मिळवणाऱ्या गोलंदाजांमध्ये तो चौथ्या स्थानावर आहे. लखनऊच्या त्यांच्या घरच्या मैदानात पराभूत करणे सोपे नाही. गेल्या सामन्यात त्यांनी गुजरातला पराभूत केले. एडीन मार्करम, मिचेल मार्श आणि निकोलस पूरन यांनी लखनऊसाठी प्रभावी कामगिरी केली आहे. गुजरातविरुद्धच्या सामन्यात संघात स्थान मिळालेल्या विल ओरूरकेने चमक दाखवली. हंगामाच्या अखेरच्या सामन्यात ऋषभ पंतकडून धावांची अपेक्षा असेल.

### 'करो या मरो'

"बंगळूरुतील सामन्यात जिंकणं टीमसाठी अत्यावश्यक आहे, कारण पराभव झाल्यास त्या टीमला टुर्नामेंटमधून बाहेर जावं लागेल." अशा परिस्थितीत "बंगळूरुला विजय अनिवार्य!" हे विधान हे केवळ सामन्याचं महत्त्व दर्शवत नाही, तर त्या टीमच्या उर्वरित संधी आणि अस्तित्वाशी संबंधित आहे.

आयपीएल मध्ये जर एखादी टीम पॉईंट्स टेबलमध्ये खालच्या स्थानी असेल, आणि शेवटचा सामना बंगळूरुच्या स्टेडियमवर असेल, तर त्या सामन्यात जिंकणं त्यांच्यासाठी 'करो या मरो'सारखं असतं.

अशावेळी क्रीडा विश्लेषक किंवा कॉमेंटेटर म्हणतात, "बंगळूरुतील विजयच आता त्यांना पुढे नेऊ शकतो. – इथे पराभव म्हणजे थेट बाहेरचा रस्ता!"

# फलंदाजांमुळेच कसोटी मालिकेत अपयश

## भारताचा अनुभवी खेळाडू केएल राहुलचे कसोटी मालिकेबद्दल मत

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या अनुपस्थितीत भारतीय संघ इंग्लंडविरुद्ध कसोटी मालिकेसाठी सज्ज होत असतानाच भारताचा प्रमुख फलंदाज केएल राहुल याने अलीकडच्या काळात फलंदाजीतील चुकांमुळेच कसोटी मालिकेत अपयश सहन करावे लागल्याची कबुली दिली.**



'आयपीएल'मधील दिल्ली कॅपिटल्स संघाचे आव्हान संपल्यानंतर दिलेल्या मुलाखतीत राहुलने आपली मते स्पष्टपणे मांडली. "गेल्या काही कसोटी मालिकांत आम्हाला फलंदाजी चांगली करायला हवी होती. फलंदाजांच्या अपयशामुळेच कसोटी क्रिकेटमध्ये भारताला पराभवाचा सामना करावा लागला. घरच्या मैदानावर न्यूझीलंडविरुद्धची मालिका ३-० गमावली, त्यानंतर ऑस्ट्रेलियातही त्याच चुका केल्या," असे राहुल म्हणाला. घरच्या खेळपट्ट्यांची चांगली माहिती असतानादेखील न्यूझीलंड गोलंदाजांनी आम्हाला शांत ठेवण्याचा मार्ग शोधून काढला. भारतीय फलंदाज धावांसाठी धडपडत होते आणि दबावाखाली खराब फटके खेळून गेले, असेही राहुलने नमूद केले.

खेळपट्टी फिरकीला साथ देणाऱ्या होत्या. आमच्याकडे दर्जेदार फिरकी गोलंदाजी होते. पण, न्यूझीलंडला आमच्यावर दबाव आणणे जमले. आम्ही चांगली फलंदाजी केली असती, तर मालिका वाचवू शकलो असतो, अशीही कबुली राहुलने दिली. स्वतःच्या फलंदाजी क्रमांकाविषयी बोलताना राहुलने संघाची गरज हाच आपल्या फलंदाजीचा क्रमांक असल्याचे सांगितले. दशकाहून अधिक काळच्या कारकीर्दीत राहुलची संघातील फलंदाजीची जागा निश्चित नाही. "संघाची गरज ओळखून खेळात बदल करण्यात मी नेहमी तयार असतो. कर्णधार किंवा निवड समितीसमोर बसून मी काय करू शकतो असे सांगणे मला कधी जमले नाही. त्यामुळे समोर येईल त्या क्रमांकावर फलंदाजी करण्याचा मार्ग कायम निवडला," असे राहुल म्हणाला.

### ट्वेन्टी20 विश्वचषक माझे लक्ष्य

राहुलने आपल्याला ट्वेन्टी-२० क्रिकेटसाठी भारतीय संघात पुन्हा स्थान मिळवायचे आहे. ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धा हे माझे लक्ष्य असल्याचे सांगितले. "खेळ खूप पुढे गेला आहे. वेगवान झाला आहे. त्यामुळे मी कुठे सुधारणा करू शकतो, खेळाशी जुळवून घेण्यासाठी मला काय करावे लागेल, संघात पुन्हा स्थान मिळविण्यासाठी काय करता येईल याचा सध्या मी विचार करत आहे," असे राहुल म्हणाला. यंदाच्या 'आयपीएल'मध्ये दिल्ली कॅपिटल्सचे आव्हान संपुष्टात आले असले, तरी राहुलने पाचशेहून अधिक धावा करून आपली छाप पाडली आहे. 'आयपीएल'मध्ये सहभाग नोंदवताना पाचव्यांदा राहुलने पाचशेपेक्षा अधिक धावा करण्याची कामगिरी केली आहे.

### के. एल. राहुल याचे विधान

"मागील काही कसोटी मालिकांकडे पाहता, आम्हाला निश्चितच चांगली फलंदाजी करायला हवी होती. घरच्या परिस्थितीत तीन कसोटी सामने गमावणे, जिथे आम्ही क्वचितच पराभूत झालो आहोत, हे निराशाजनक आहे." राहुल यांनी न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेत संघाला सहज धावा मिळू न दिल्यामुळे दबाव निर्माण झाला आणि त्यामुळे खेळाडूंनी चुकीचे फटके खेळले, असे सांगितले. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेतही संघाने महत्त्वाच्या क्षणांमध्ये चुक केल्याचे त्यांनी मान्य केले. राहुल यांनी इंग्लंडमधील आगामी कसोटी मालिकेकडे "नव्या युगाची सुरुवात" म्हणून पाहत, संघाच्या पुनरागमनाबाबत आशावाद व्यक्त केला. रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या निवृत्तीनंतर, राहुल यांच्यावर फलंदाजीतील अनुभवाचे ओझे आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। बुधवार ।
। दि. 28 मे 2025 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

KAMALA Education Society

KAMALA EDUCATION SOCIETY'S

## PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167

Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

## ADMISSIONS OPEN

Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)

BBA



Bachelor of Business Administration

BCA



Bachelor of Computer Applications

### Highlights:

- Advanced Industrial and Research Learning
- Proven Track Record of Placements
- Mentoring and Seed Funds for Startups
- Skill Development and Certification Courses
- Live Industrial Projects
- Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
- Govt. and Management Scholarships
- State of the Art infrastructure
- ICT enabled classrooms

Eligibility: Passed HSC Examination with any stream

**Call for more details:**

BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556

BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more

## एसबी पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटला

# ‘अकॅडमिक ऑटोनॉमी’चा बहुमान!

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्याकडून शैक्षणिक स्वायत्तता बहाल




**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित २००९ साली स्थापन झालेल्या एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (एसबीपीआयएम) या नामवंत व्यवस्थापन महाविद्यालयाने आपल्या यशस्वी वाटचालीत आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. संस्थेला विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्याकडून शैक्षणिक स्वायत्तता (‘अकॅडमिक ऑटोनॉमी’) बहाल करण्यात आली आहे. ही स्वायत्तता २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून लागू होणार आहे.**

एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ही संस्था पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट या १९९० पासून कार्यरत असलेल्या ख्यातनाम शैक्षणिक संस्थेच्या अंतर्गत कार्यरत आहे. विविध क्षेत्रातील गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याच्या उद्दिष्टाने ही संस्था अनेक विद्यार्थ्यांचे करिअर घडविण्यात यशस्वी ठरली आहे.

एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ही संस्था नॅक कडून ए प्लस श्रेणीत मानांकित असून, एनबीए मान्यताप्राप्त दोन वर्षांचा पूर्ण वेळ व्यवस्थापन अभ्यासक्रम (एमबीए) येथे चालवला जातो. ही संस्था सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न आहे. एसबीपीआयएमने आतापर्यंत अनेक शैक्षणिक सन्मान व पुरस्कार प्राप्त केले आहेत. या संस्थेचे बरेचसे विद्यार्थी आज राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध नामवंत संस्थांमध्ये उच्च पदांवर कार्यरत आहेत.

एसबीपीआयएमला ‘अकॅडमिक ऑटोनॉमी’ मिळाल्या बद्दल पीसीईटीच्या विश्वस्त मंडळाने महाविद्यालयाच्या प्राध्यापक वर्ग व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांनी या यशाबद्दल बोलताना सांगितले की, एसबीपीआयएमने गुणवत्ता आणि शिस्तीच्या माध्यमातून आजवर केलेली वाटचाल प्रेरणादायी आहे. ही शैक्षणिक स्वायत्तता संस्थेला स्वतंत्र, नाविन्यपूर्ण व उद्योगाभिमुख शिक्षण देण्यासाठी सक्षम बनवेल.

पीसीईटीच्या उपाध्यक्ष पद्माताई भोसले म्हणाल्या की, एसबीपीआयएम मधून शिकणारे विद्यार्थी उद्योगाच्या गरजेनुसार प्रशिक्षित होत आहेत. यामुळे त्यांचे करिअर अधिक बळकट होईल. ही संधी विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी आहे.”

पीसीईटीचे सचिव विठ्ठल काळभोर यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या संशोधन आणि नवकल्पनांना उत्कृष्ट दर्जाचे व्यासपीठ निर्माण करून देण्याचे काम एसबीपीआयएम समर्थपणे करीत आहे.

पीसीईटीचे खजिनदार शांताराम गराडे यांनी नमूद केले की, “विद्यार्थी-केंद्रित शिक्षण पद्धतीचा अवलंब केल्याने येथील विद्यार्थी अधिक सक्षम आणि आत्मविश्वासपूर्ण काम करून देशाच्या विकासात हातभार लावत आहेत.

### उद्योगानुरूप अभ्यासक्रमांची रचना करू- डॉ. धारवाडकर

एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट च्या संचालिका डॉ. कीर्ती धारवाडकर म्हणाल्या,”ही शैक्षणिक स्वायत्तता हे केवळ एक सन्मान नाही, तर एसबीपीआयएम च्या शैक्षणिक आणि संशोधनात्मक वाटचालीला दिशा देणारा टप्पा आहे. आम्ही आता उद्योगानुरूप अभ्यासक्रमांची रचना करू, संशोधनाला चालना देऊ, विद्यार्थी-केंद्रित शिक्षण राबवू आणि जागतिक ट्रेंडशी सुसंगत अधिक सक्षम विद्यार्थी घडवू.”

पीसीईटीचे विश्वस्त हर्षवर्धन पाटील यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, एसबीपीआयएम आता जागतिक ट्रेंडशी सुसंगत मूल्यवर्धित अभ्यासक्रम राबवू शकेल, जे आमच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धेला सामोरे जाण्यास मार्गदर्शक ठरतील.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट चे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनीही एसबीपीआयएम च्या प्राध्यापकांचे अभिनंदन करताना सांगितले की, संस्थेचा संपूर्ण विकास हीच आमची प्राथमिकता आहे. शैक्षणिक स्वायत्ततेमुळे आता अधिक गुणवत्ता साधता येणार आहे.





MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
7
STAR
RANKING
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
Website : www.http://mastermindglobalschool.com


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY
For more info
95277 64646 / 77967 67292


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JR. COLLEGE
WE MAKE YOUR FUTURE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
ADMISSION
OPEN
2025-2026
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241